# ठाणे महानगरपालिका, ठाणे
## संचलित
# चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था

## निवेदन
(स्पर्धा परीक्षा पुर्वतयारी मार्गदर्शन वर्ग)

ठाणे महानगरपालिका संचलित चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था ही केंद्रीय लोकसेवा आयोगा (यु.पी.एस.सी.) मार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षांचे नि:शुल्क मार्गदर्शन करणारी महाराष्ट्रातील एक अग्रगण्य संस्था आहे. आजवर संस्थेच्या अनेक विद्यार्थ्यांनी केंद्रीय प्रशासकीय सेवेत प्रवेश मिळविलेला आहे.

स्पर्धा परीक्षेस बसू इच्छिणाऱ्या आणि माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण होऊन सध्या पदवी अभ्यासक्रमाच्या पहिल्या अथवा दुसऱ्या वर्षात असलेल्या विद्यार्थ्यांसाठी चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेतर्फे एक पुर्वतयारी मार्गदर्शन वर्ग चालवला जातो, या वर्गात प्रवेश घेणेकरीता उच्च माध्यमिक परीक्षेत विज्ञान व वाणिज्य शाखेत 80 टक्के आणि कला शाखेत 70 टक्के गुण मिळालेले विद्यार्थी अर्ज करण्यास पात्र आहेत. अशा इच्छुक विद्यार्थ्यांनी कोऱ्या कागदावर आपले नांव, पत्ता, दूरध्वनी व मोबाईल क्रमांक, ई-मेल, शैक्षणिक अर्हता/गुणवत्ता इत्यादी तपशिलासह अर्ज सादर करावा. या अर्जासोबत उच्च माध्यमिक परीक्षेच्या गुणपत्रिकेची प्रत व शाळा सोडल्याचा दाखल्याची (स्कूल लिव्हिंग सर्टिफिकेट) प्रत जोडणे आवश्यक आहे. तसेच **" स्पर्धा परीक्षेला बसण्यात का रस आहे "** या विषयावर 300 शब्दांत एक टिपण स्वहस्ताक्षरात लिहून ते अर्जासोबत जोडणेही आवश्यक आहे. गुणपत्रिकेची प्रत व हे टिपण नसल्यास अर्ज अपात्र ठरविण्यात येईल. **अर्ज हे दिनांक – 01 ऑगस्ट 2019 ते 09 ऑगस्ट 2019 या कालावधीत सकाळी 11.00 ते सायंकाळी 05.00** या कार्यालयीन वेळेत संस्थेत (संचालक, चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था, तळ मजला, नानासाहेब धर्माधिकारी ग्रंथालय इमारत, वेदांत कॉम्प्लेक्स समोर, कोरस रोड, वर्तकनगर, ठाणे (प.) - 400 606. दुरध्वनी-022-25881421) या पत्त्यावर स्विकारण्यात येतील.

**मुलाखतीसाठी निवड झालेल्या उमेदवारांची यादी 13 ऑगस्ट, 2019 रोजी सायंकाळी 05.00 वाजता संस्थेच्या नोटीस बोर्डावर तसेच संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल.** पोस्टाने, कुरियर अथवा ई-मेल व्दारे पाठविलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

**सही/-**
**(महेश राजदेरकर)**
**माहिती व जनसंपर्क अधिकारी**
ठाणे महानगरपालिका, ठाणे

दिनांक: 29/07/2019.